# समांतर आरक्षणाच्या संभ्रमावर तोडगा

म. टा. प्रतिनिधी, पुणे

राज्य सरकारच्या सरळ सेवा भरती प्रक्रियेत समांतर आरक्षणामध्ये खुल्या प्रवर्गातील उमेदवारांची गुणवत्तेच्या निकषानुसार निवड यादी तयार करताना खुल्या प्रवर्गांत गुणवत्तेच्या आधारावर अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व एसईबीसी अशा मागासवर्गीय उमेदवारांचाही समावेश करावा. या गुणवत्तेच्या यादीनुसारच खुल्या प्रवर्गातील पदे भरावीत, असा निर्णय राज्य सरकारच्या सामान्य प्रशासन विभागाने बुधवारी घेतला. या निर्णयात समांतर आरक्षणाबाबत कार्यपद्धती प्रसिद्ध करण्यात आली आहे.

समांतर आरक्षणाच्या गोंधळामुळे राज्यात पद भरतीत सुरू असलेल्या संभ्रमावर बुधवारी राज्य सरकारने हा तोडगा काढला आहे. खुला प्रवर्ग सर्वच प्रवर्गातील गुणवत्ताधारक उमेदवारांसाठी खुला असल्याचा फेरबदल राज्य सरकारने बुधवारी केला. राज्य सरकारच्या १३ ऑगस्ट २०१४ च्या परिपत्रकानुसार खुल्या प्रवर्गातील जागांवर आरक्षित प्रवर्गातील उमेदवाराला गुणवत्ता असली, तरी प्रवेश मिळणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले होते. त्यानुसार महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) पदभरतीची प्रक्रिया सुरू केलेली होती. मात्र, या परिपत्रकावर उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. या परिपत्रकानुसार अनेक याचिका दाखल होण्याची शक्यता असल्याने भरतीप्रक्रियेत अडथळे निर्माण होण्याची भीती सरकारने व्यक्त केली आहे. नवीन विशेष भरती मोहीम देखील राबविण्यात येणार आहे. मोहिमेमध्ये सरकारच्या विविध विभागांमधील हजारो पदे भरण्यात येणार आहे. अशातच समांतर आरक्षणाच्या धोरणाबाबत स्पष्टता नसल्याने मोठ्या प्रमाणावर न्यायालयीन प्रकरणे उद्‌भवण्याची शक्यता आहे. त्यानुसार खुल्या प्रवर्गातील जागांवर सर्वच प्रवर्गातील उमेदवारांना गुणवत्तेच्या आधारे प्रवेश द्यावा, असे आदेश सरकारने दिले आहेत.

राज्य सरकारच्या नव्या निर्णयानुसार खुल्या प्रवर्गातील उमेदवारांची गुणवत्तेच्या निकषानुसार निवड यादी तयार करायची आहे. या यादीत खुल्या प्रवर्गात गुणवत्तेच्या आधारावर मागासवर्गीय उमेदवारांचाही (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व एसईबीसी) समावेश होईल.